# प्रकरण दुसरे

## ।। अनिल अवचट यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय ।।

## प्रकरण दुसरे

## ।। अनिल अवचट यांच्या व्यक्तिमत्त्वाचा परिचय ।।

पहिल्या प्रकरणात "ललित गद्य - व्याख्या, स्वरूप व मराठी ललित गद्याचा आढावा" याचा विचार केला. या पार्श्वभूमीवर "अनिल अवचटांच्या ललित गद्य लेखनाची वैशिष्ट्ये", "माणसं", व "धागे आडवे उभे" या ग्रंथांच्या आधारे आपण पाहणार आहोत. तत्पूर्वी या प्रकरणात अनिल अवचटांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची ओळख करून घेणार आहोत.

**जन्म :-**

अनिल त्र्यंबक अवचट यांचा जन्म दि. २६.०८.१९४४ रोजी "ओतूर" येथे एका सधन शेतकरी कुटुंबात झाला. वडील श्री.त्र्यंबक अवचट हे व्यवसायाने डॉक्टर. आईलाही कलेची आवड होती.

**भावंडे :-**

हे चौघे भाऊ व चौघी बहिणी, सर्वात थोरली बहीण त्यानंतर दोन नंबरला अनिल अवचट. भावंडांमध्ये सुभाष अवचट हे चित्रकार व मराठी साहित्यातील लेखक आहेत. अनिल अवचटांच्या पुस्तकांची मुखपृष्ठे व आतील रेखाचित्रे ही सुभाष अवचटांनीच रेखाटलेली आहेत.

**बालपण :-**

अवचट कुटुंब ओतूर सारख्या ग्रामीण भागातील, सधन शेतकरी, जुने वळण, सनातनी विचार व धार्मिक संस्कार असलेले. अनिल अवचटांचे बालपण, वयाच्या चौदा वर्षापर्यंत ओतूर या खेड्यातच गेले. निसर्गाच्या सान्निध्यात, नैसर्गिक अशीच त्यांची

वाढ झाली· घरातील धार्मिक वातावरण, कीर्तन, भजन, वारकरी संस्कृतीचा मोठा प्रभाव अशा सुसंस्कृत, संपन्न वातावरणात अनिल अवचटांचे पोषण झाले· गावपातळीवर असणा-या निरनिराळ्या जातींशी, धर्माशी, चालीरीती, रिवाज, रूढी यांच्याशी अनिल अवचटांचा प्रत्यक्ष संबंध आला, वर्गात निरनिराळ्या जातींची मुले होती आणि ह्या सगळ्यांच्या घरीदारी त्यांचा वावर असे· महारवाड्यातही जाणेयेणे असायचे·

गावातील बारा बलुतेदार, त्यांचे जीवनमान त्यांना लहानपणीच जवळून पहायला मिळाले, त्यामुळे भारतीय लोकजीवनाचे, भारतीय माणसांचे आकलन बालपणीच्या चौदा वर्षांच्या कालावधीतच अनिल अवचटांना झाले· म्हणजे पुढे ज्या विषयांचे लेखन त्यांनी केले, त्याची पार्श्वभूमीही बालपणीच तयार झाली होती·

## शिक्षण : प्राथमिक / माध्यमिक :-

अनिल अवचटांचे पहिली ते नववी पर्यंतचे शिक्षण ओतूर या त्यांच्या जन्मगावी झाले·

दहावी व अकरावी "मॉडर्न हायस्कूल, पुणे" या ठिकाणी झाली·

**महाविद्यालयीन शिक्षण :-** प्री·डीग्री व इंटर पर्यंतचे शिक्षण फर्ग्युसन कॉलेज, पुणे या ठिकाणी झाले·

**वैद्यकीय शिक्षण :-** "एम·बी·बी·एस" बी·जे·मेडिकल कॉलेज, पुणे, या ठिकाणी झाले·

## विवाह / कुटुंब :-

अनिल अवचटांनी आपली पत्नी डॉ·सौ·सुनंदा यांची निवड बी·जे·मेडिकल कॉलेजमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असताना, एकमेकांशी झालेल्या मैत्रीतून, एकमेकांविषयी वाटणा-या आवडीतून नि विशेष म्हणजे एकमेकांना समजावून घेऊन केली आहे· अवचटांच्या घरातून असलेला विरोध स्वीकारला, घरच्यांना विवाहाविषयीचे स्वतःचे मत पटवून देऊन डॉ·सुनंदा यांच्याशी विवाह केला· जीवनावर मनस्वी प्रेम करणा-या या लेखकाचे स्वतःच्या कुटुंबावर निस्सीम प्रेम आहे· "सुनंदा, हे पुस्तक अर्पण करण्यासाठी तुला काही काळ माझ्यातून बाहेर काढावं लागतया त्याबद्दल थोडी रूखरूख" या "स्वतःविषयी"

पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेवरून पत्नीप्रेमाविषयीची विलक्षण एकरूपता दिसून येते, प्रेमाचे अद्वैत स्वरूप पहावयास मिळते·

अनिल अवचटांना मुक्ता व यशोदा अशा दोन मुली· दोन्ही मुलींना कार्पोरेशनच्या जिथे गरीब घरातली मुले शिकतात अशा शाळेत, दोघांनीही ठरवून जाणीवपूर्वक घातले, की जेणेकरून त्यांना भारतीय समाजजीवनाची, समाजमनाची ओळख होईल· पुढचे अभ्यासक्रम मात्र त्यांच्या आवडीनिवडीप्रमाणे घेऊ दिले, लहान असताना वडील म्हणून मोठी झाल्यानंतर मित्र म्हणून त्यांच्याशी वागत असताना हे जग बघत असताना त्यांना कुतूहल निर्माण झाले तर त्यांच्या वाढीस योग्य त्या पध्दतीने साथ करत, त्यांच्या स्वतंत्र व्यक्तिमत्त्व विकासाला मार्ग करून दिला·

मुक्ता बी·ए· झाली आहे· ट्रेकींग, वगैरे करते· यशोदाने कमर्शियल आर्टस्ची पदवी घेतली आहे· तिला गाण्याची आवड आहे·

असा हा कुटुंबात रमणारा लेखक आयोवासारख्या दूरच्या मुक्कामातही पत्नीच्या पत्राबरोबर दिवस जगतो, मुलगी यशोदाचा भोळाभाबडा सरळ स्वभाव पत्रातून दिसतो, तर मुक्ताचा "अलिप्त" वाटणारा पण बाबांच्या प्रतीची ओढ असणारा स्वभाव त्यांना जाणवतोय· काम करणा-या बाईचा छोटा मुलगा "बाबा" म्हणून जेवेनासा होतो, तर मुक्तांगणमधले बरे झालेले व्यसनी म्हणजे "सुनंदाची मुलं" आणि त्यांच्या बायका या अवचटांच्या "मुली", त्यांची ही पत्रे जेव्हा मिळतात तेव्हा हा लेखक एका "विश्वात्मक कुटुंबात" वावरत असताना दिसतो·

## स्वभाव :-

अनिल अवचटांचा स्वभाव सौम्य, शांत नि स्वतःत रमणारा आहे· नास्तिक असणा-या ह्या लेखकामध्ये एक अध्यात्माच्या पातळीवर वावरणारा उदात्त मनाच्या विचारांचा पिंड आहे· परखड आत्मपरीक्षणाची त्यांच्या मनाची धारणा आहे· त्यामुळे त्यांना स्वतःविषयी खूप जाणवते, स्वतःच कबूल करतात· उदा· काही कामे वेळच्या वेळी न करणे, पत्रोत्तर न देणे, लेखाची, कादंबरीची हस्तलिखिते वाचावयास उशीर होणे, इत्यादी पण या स्वभावदोषामुळे एखादी चांगली संधी हुकते, रोष ओढवतो, याची त्यांना जाणीव आहे· स्वतःत रमणा-या व अनेक छंद असलेल्या कलावंताकडून

असे घडणे शक्य आहे. त्याचबरोबर हा कलावंतमनाचा लेखक एखादी गोष्ट मनापासून वाटल्याशिवाय करणार नाही नि त्याला त्यासाठी स्वभाव बदलावा असे वाटणार नाही, पण अनिल अवचटांच्याकडे परदुःख पाहून गहिवरणारे मन आहे, समाजजीवनातील दुःख पाहून अपराधीपणाची जाणीव होणारी सहृदयता आहे. असा "स्व"ला शोधत मानवसमूहात फिरणारा हा कलावंत लेखक आहे.

छंद :-

अनिल अवचट कलावंत मनाचे लेखक आहेत. त्यांचे ड्रॉईंग, ओरिगामी, शिल्पकला, क्ले मॉडलिंग, फोटोग्राफी, काष्ठशिल्प, पेन्सिल ड्रॉईंग, पेंटिंग्ज, हार्मोनिअम, बासरी, शास्त्रीय संगीत, हे सारे छंद फक्त स्वतःपुरतेच आहेत.

"लेखन" हे मात्र त्यांचे करियर आहे. लेखन वगळता कुठल्याही क्षेत्रात कार्य करावयाचे नाही, त्यातून पैसा मिळवायचा नाही अशी त्यांची भूमिका आहे.

कार्यकर्ता म्हणून भूमिका :-

रचनात्मक कार्य करणाऱ्या या लेखकाचा पिंड कार्यकर्त्याचा आहे. वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच नाटक, नेपथ्य, कला, रांगोळी, कॉलेज निवडणुका, मॅगेझिन संपादक अशा विविध कामात रमणारे अनिल अवचट समाजकार्यात सक्रिय सहभागी झालेले दिसतात. महाविद्यालयीन काळात कुमार सप्तर्षींसह बनवलेला विद्यार्थी ग्रुप, कोयना भूकंप, बिहारचा दुष्काळ या आपत्तीच्या काळात त्या त्या ठिकाणी जाऊन मदत कार्य केले, डॉक्टरी सेवा लोकांना उपलब्ध करून दिली. "बिहार दुष्काळग्रस्तां"साठी "बिहार परिवार" मंडळ स्थापून पुण्यातून पैसा जमा केला व बिहारमध्ये जाऊन अन्नकेंद्र, दवाखाने चालविले.

"ओतूर सारख्या लहान गावात एका मध्यमवर्गीय, धार्मिक, ब्राह्मण कुटुंबात वाढलेले अवचट मेडिकलच्या पाच वर्षात बदलले, जातपात, धर्मभेद, सामाजिक विषमता याकडे वेगळ्या दृष्टीने बघायला लागले. ही विषम व्यवस्था बदलण्याच्या ऊर्मीने अस्वस्थ व्हायला लागले. म्हणून त्यांचं लेखनही सर्वसाधारण मध्यमवर्गीय लेखकापेक्षा वेगळं आणि महत्त्वाचं झालं."[8]

अनिल अवचट "युक्रांद" चे संस्थापक सदस्य आहेत. युवक चळवळीत त्यांना तुरुंगवासही घडला आहे. महात्मा फुले समता प्रतिष्ठानचे कार्यकर्ते असलेल्या अवचटांवर एस.एम.जोशी, ना.ग.गोरे, बाबा आढाव अशा समाजवादी विचारवंत कार्यकर्त्यांच्या शिकवणीचा संस्कार झाला, सहवास लाभला. या सर्वांच्या बरोबर विविध चळवळींत, विविध पातळ्यांवर काम करताना, सामाजिक, आर्थिक प्रश्नांची खोलवर जाणीव त्यांना झाली.

## मुक्तांगणमधील कार्य :-

अनिल अवचट दांपत्याचे "मुक्तांगण" या संस्थेमार्फत व्यसनाधीन झालेल्या मनोरुग्णांना व्यसनमुक्त करण्याचे कार्य चालू आहे. व्यसनाधीनता उद्भवू नये म्हणून प्रतिबंधात्मक तसेच प्रत्यक्ष रुग्णांवर उपचार व नंतर त्यांचे पुनर्वसन अशा तीन पातळ्यांवर हे कार्य १९८६ पासून सुसूत्रपणे व तळमळीने सुरु आहे. "मुक्तांगण" या व्यसनमुक्ती केंद्राचा १९९२ पर्यंत सुमारे साडेसात हजार रुग्णांनी लाभ घेतला आहे.

मनाला उभारी देणा-या या त्यांच्या समाजकार्याबद्दल सेवासदन संस्थेचा के.गो.कृ. देवधर पुरस्कार, रोख दहा हजार व स्मृतिचिन्ह, डॉ.बानू कोयाजी यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला, त्यावेळी बोलताना डॉ.कोयाजी म्हणाल्या, "व्यसनासक्त लोकांना व्यसनमुक्त करून त्यांचे जीवनच त्यांना परत देण्याचे फार मोठे काम तुम्ही करीत आहात."[२] "ज्यांना कुटुंबातून, समाजातून नाकारण्यात आले, त्यांना आपलेपणा देवून तुम्ही काम करत आहात. हे एका परीने देवाचेच काम तुम्ही करीत आहात."[३]

व्यसन एक आजार आहे, तो बरा करता येतो, हे रुग्णाला, त्यांच्या कुटुंबियांना पटवून देऊन त्यांना भावनिक, मानसिक आधार व आपुलकी देणे हा त्यांच्या कार्याचा गाभा आहे, किंबहुना अवचटांच्या लिखाणाचा देखील "प्रेम दिल्याने प्रेम वाढते." हा कार्यातून अनुभव घेणारा, देणारा असा हा लेखक "माणसां"वर प्रेम करणारा आहे.

## पत्रकारिता :-

बिहार दुष्काळग्रस्तांसाठी पैसा जमा करताना, काम करताना जे जे अनुभव आले ते जसेच्या तसे अवचटांनी शब्दबध्द केले नि इथेच एका पत्रकारितेचा जन्म झाला. "रिपोर्ताज्" पध्दतीच्या लिखाणाला सुरुवात झाली, शब्दबध्द झालेले हे अनुभव पहिल्यांदा

"सकाळ" ने प्रसिध्द केले. हेच अवचटांचे पहिले स्वतंत्र लेखन.

अनिल अवचट "साधना" साप्ताहिकाचे तीन वर्षे सह संपादक होते. "पुरोगामी सत्यशोधकाचे" कार्यकारी संपादक म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

"माणूस", "स्त्री", "किर्लोस्कर", "मनोहर", "महाराष्ट्र टाइम्स", विविध वृत्तपत्रे, दिवाळी अंक यासारख्या सर्व त-हेच्या नियतकालिकांमधून अवचट सातत्याने लिखाण करतात.

**पुरस्कार :-**

दोन वेळा डहाणूकर पत्रकारिता पारितोषिक.

तीन वेळा राज्य पुरस्कार

कराड नगरवाचनालय पारितोषिक

केसरी-मराठा ट्रस्ट पारितोषिक

वाल्मीकी पारितोषिक

फाय फॉंडेशन पुरस्कार

"आयोवा इंटरनॅशनल रायटर्स प्रोग्रॅम" निमंत्रणावरून अमेरिका अभ्यास दौरा.

सेवासदन संस्थेचा कै. गो. कृ. देवधर स्मृती पुरस्कार देण्यात आला.

**अवचटांची ग्रंथसंपदा :-**

**पूर्णिया[१] :-**

बिहारमधील पूर्णिया जिल्हा, त्या ठिकाणची सामाजिक गुलामगिरी, दारिद्र्य, मागासलेपण, माणसांच्या लाचार जीवनाचे वर्णन लेखकाने या पुस्तकात केले आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत प्रा. नरहर कुरूंदकर म्हणतात, "अनिल अवचटांचे हे लेखन म्हणजे एका समाजवादी निष्ठेच्या तरूणाची प्रतिकारशून्य सामाजिक गुलामगिरीच्या समाजरचनेविषयीची प्रतिक्रिया आहे." बिहारच्या चिरवंचित माणसाचे हे ओझरते दर्शन आहे. अनिल अवचटांनी आपल्या तटस्थ भासणा-या पण उत्कट व्यथा निर्माण करणा-या शैलीत तेथल्या उद्ध्वस्त जीवनाचे वर्णन केले आहे.

वेध[५] :-

हे पुस्तक म्हणजे अनिल अवचटांनी साधना साप्ताहिकात "वेध" या सदरात नियमितपणे केलेल्या लिखाणाचे संपादन आहे. गंधर्व रंगमंदिर, नेहरू स्टेडियम इत्यादी साठीचे कर्ज, राखीव जागांचा प्रश्न, स्त्री गुलामगिरी, गणपती उत्सवाचे झालेले विकृतीकरण, प्रेमिकांची कहाणी, उपवर मुलगी, हुंडा, झोपडपट्टी प्रश्न, अशा विविध ३६ विषयांचा "वेध" लेखकाने या लेखांत घेतला आहे. या लेखसंग्रहाला प्रस्तावना विजय तेंडुलकरांची आहे.

हमीद[६] :-

सामाजिक चळवळीत कार्यकर्ता म्हणून काम करताना आणि अनेक प्रसंगांत हमीद दलवाईंचा जो सहवास लाभला, त्या सहवासातील आठवणी लेखकाने शब्दबध्द केल्या आहेत.

अंधेरनगरी निपाणी[७] :-

कर्नाटक महाराष्ट्र सीमाभागात असलेली ही निपाणी "तंबाखू"साठी प्रसिध्द आहे. त्यामुळे त्या ठिकाणी तंबाखू व्यापाऱ्यांची असणारी मक्तेदारी, वर्चस्व व असहाय्य गरीब स्त्री-पुरूष कामगारांची लुबाडणूक, त्यांच्यावर होणारे अन्याय-अत्याचार, बलात्कार अशा चहूबाजूंनी शोषित पददलितांचे, कामगारांचे प्रश्न, त्यांच्या समस्या, विडी कामगार स्त्री-पुरूषांच्या हलाखीच्या जीवनाचे वर्णन अवचटांनी या ठिकाणी मांडले आहे. स्वतंत्र भारतात घटनेने दिलेल्या हक्काचा कोणताही प्रकाश तंबाखू कारखान्यांच्या गोडावूनपर्यंत पोहचत नाही. अशी ही अंधेरनगरी निपाणी. वाचून वाचक सुन्न व्हावा अशीच आहे.

छेद[८] :-

समाजजीवनातील अन्याय, अत्याचार, गुलामगिरी, फसवणूक याचा "छेद", "स्त्रियांची दोन अधिवेशने", मुस्लिम एक दुर्दैव-एक झगडा, महिला अधिवेशनातील कडक इस्त्री, सारस्वत संमेलनातील सांस्कृतिक उत्खनन, चांभाराची चौकशी, दुष्काळ यात्रा, मासा गिळतो माशाला, दंगल - १६ मे पुणे, डॉक्टर्स - जगवतात की नागवतात. या लेखांच्यामधून अनिल अवचटांनी घेतला आहे.

संभ्रम[९] :-

कर्मठ, सनातनी, धर्मवेडया, भोंगळ माणसांचा विचार ते येथे मांडतात. या विचारांना छेद देणारे स्वतःचेही विचार मांडतात. या द्वंद्वात्मकतेकडून आणि विरोध-लयीतून अवचटांचा कर्मठ, सनातन्याविरुद्धचा सामाजिक विचार वाचकांच्या समोर ठसठशीतपणे येत जातो.

वाघ्या मुरळी[१०]:-

अनिल अवचटांनी आपल्या या पुस्तकात "वाघ्या-मुरळी"च्या जीवनाचे, चालीरीतींचे, रूढी व विविध समस्यांच्या स्वरूपांचे रेखाटन केले आहे. डोळ्यांसमोरील एखादी मुलगी मुरळीचा आकार सहजपणे, स्वेच्छेने घेते हे त्या समाजातील अज्ञान आणि आपण काही करू शकत नाही ही व्यथा लेखकाने मांडली आहे.

कोंडमारा[११]:-

"कोंडमारा" दलितांच्या जीवनाचा, त्यांच्यावर होणारा अन्याय, अत्याचार त्यांना मुकेपणाने सहन करावा लागतो, ते करीत आहेत. या त्यांच्या कोंडमाऱ्याचा अन्याय, अत्याचाराचा रिपोर्ताज् पध्दतीने घेतलेला शोध म्हणजे हे पुस्तक होय. अवचटांच्या लेखनामधून अत्याचाराला मूल्य मानणाऱ्या जीवनविरोधी प्रवृत्तीसंबंधीचा विषाद, अत्याचार करणारे उजळ माथ्याने जगत राहतात या भयावह वस्तुस्थितीची जाणीव हे पुस्तक करून देते. इ.स. १९७२ ते १९७९ या काळात "साधना", "मनोहर", "केसरी", "महाराष्ट्र टाइम्स" मधून प्रसिध्द झालेले हे लेख या संग्रहात एकत्र केले आहेत.

गर्द[१२] :-

गर्दचे व्यसन ही एक जागतीक समस्या झाली आहे. या समस्येने वादळाच्या वेगाने समाजाला ग्रासले आहे. ब्राऊन शुगरची ही साथ आपल्या समाजात का रूजली याची अनेक कारणे आहेत - या पदार्थांची वाढलेली उपलब्धता, या पदार्थाची घातक शक्ती, वातावरणातले ताणतणाव, कुटुंबातले विसंवाद इत्यादी, या निमित्ताने साऱ्या समाजाने अंतर्मुख व्हावे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा या भयानक समस्येच्या सुरवातीच्या अवस्थेतच समाजाला जागे करावे आणि या सामाजिक प्रश्नाला रोखावे या हेतूने अनिल अवचटांनी हे लेख "महाराष्ट्र टाइम्स" या दैनिकातून प्रसिद्ध केले, त्या लेखसंग्रहाचे हे पुस्तक आहे. प्रस्तावना डॉ. आनंद नाडकर्णी यांची आहे.

**मोर[13] :-**

अवचटांचे वेगळ्या पध्दतीचे पुस्तक. रूढ अर्थाने सामाजिक नसलेले पण संवेदनशील मनात रेंगाळलेले काही क्षण त्यांनी यात टिपले आहेत. अवचटांच्यातील चित्रकार प्रभावी ठरतो. पावसाचे वर्णन ते मनसोक्तपणे रेंगाळून करतात. मोराचे सौंदर्य व क्रौर्यविरोधीलयीत रंगवत जातात आणि प्रवासात भेटलेल्या मुलांचा चेहरा, हालचाली वाचकांसमोर आणतात. सर्व लेखनात टवटवीतपणा, सहजपणा, मोकळेपणा आणि परखडपणा आहे.

**धार्मिक[14] :-**

समाजातील अंधश्रध्दा, बुवाबाजी अशा प्रश्नांशी संबंधीत असे हे लेख आहेत. धार्मिक अंधश्रध्दा, माणसाला संकुचित बनवतात. त्याचे माणूसपण हिरावून घेतात. असे माणूसपण हरवणा-या भारतीय समाजातील हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मियांमधील अंधश्रध्दांचा मागोवा घेणारे हे पुस्तक आहे.

**स्वतःविषयी[15] :-**

अनिल अवचटांनी या पुस्तकात स्वतःच्या आयुष्यातील "वळण" देणा-या काही वर्षांवर लिहिले आहे. "दहावीचं वर्ष", "डॉक्टरी", "मुक्काम नानापेठ", "धार्मिक नि संगोपन" या पाच दीर्घ लेखांत पूर्वायुष्यात डोकावून काही अनुभव, विशिष्ट दृष्टी घेवून, आप्तस्वकीयांसह स्वतःलाही परखडपणे पारखत "स्वतःविषयी" या पुस्तकात अवचट आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडण-घडण सांगतात.

**अमेरिका[16] :-**

"आयोवा इंटरनॅशनल रायटर्स प्रोग्रॅम" च्या निमंत्रणावरून अनिल अवचट अमेरिका दौरा करून परत आल्यानंतर त्यांच्या संवेदनक्षम मनाने टिपलेली अमेरिका, तेथील जीवनामागची विसंगती, अमेरिकन संस्कृतीचा कुरूप चेहरा, जगाच्या पातळीवर दिसणारी समान, सनातन दुःखे, काळागोरा, विस्थापित, शोषित असा मजूर, गरिबी, यांत्रिकपणा, व्यवहारवाद, मानवी जिव्हाळ्याचा अभाव, बोकाळलेली गुन्हेगारी, व्यसनाधीनता, जुगारी प्रवृत्ती, ढासळत असलेली मानवी मूल्ये आणि असुरक्षितता, सर्वत्र भेडसवणारी भयग्रस्तता यावर "अमेरिका" या अनिल अवचटांच्या पुस्तकाने प्रखर प्रकाशझोत टाकला आहे. त्याबरोबर अमेरिकन संस्कृतीचे त्यातल्या मराठी माणसांचे भेदक चित्रण केले आहे.

"माणसं"[१७] (१९८०)व "धागे आडवे उभे"[१८] (१९८६) या लेखसंग्रहांचा सविस्तर विचार करण्याचे योजिले असल्याने त्यांचा येथे विचार केलेला नाही·

१९६९ ते १९९२ पर्यंत लिहिलेल्या त्यांच्या लेखनाचे स्थूल रूप हे असे आहे·

**अवचटांचा जीवनविषयक दृष्टिकोण :-**

प्रत्येक जीव जन्मतःच स्वतंत्र असतो व तो स्वतंत्रपणे वाढला पाहिजे· प्रत्येक जीवाला जगत असताना चुका करण्याचे स्वातंत्र्य असावे, म्हणजे त्यातून तो शिकत असतो, आयुष्य तर शिकण्याचीच एक प्रक्रिया आहे हा अवचटांचा आयुष्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आहे·

अवचटांची जीवनविषयक भूमिकाच अशी आहे की, मानवाला जी काही प्रगती करावयाची ती सगळ्यांसह हे तत्त्वे स्वीकारूनच करावी लागेल, तरच इथे एक चांगले, अभिमान वाटेल असे जीवन आपण निर्माण करू हा त्यांचा प्रयत्नवाद आहे, कारण "जी दुःखे मनुष्यनिर्मित आहेत, त्यांचा निरासही तो करू शकतो·" या सूत्रावर त्यांचा विश्वास आहे·

त्या आत्मविश्वाच्या आधारे, दुःखे निर्माण करणारी ही सारी व्यवस्था, यंत्रणा बदलावी लागेल, ऐहिक भोगलालसेचा खेळ नाकारावा लागेल, शोषित समूह जागे करावे लागतील, हे यातनाचक्र थांबविण्यासाठी त्यांना सशक्त, सजग करावे लागेल· माणुसकी, बरोबरीचे नाते व सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांची प्रतिष्ठापना करून आनंददायी असे समाजजीवन बनावे, असे मनाला उभारी आणणारे कार्य सामूहिकरीत्या सर्वांनी केले पाहिजे हा त्यांचा आग्रह आहे·

समाजातील सर्व थरांमधल्या सुशिक्षित , सुजाण तरूणांनी हे आव्हान स्वीकारले पाहिजे, त्यासाठी कठोर परिश्रम, व परखड आत्मपरीक्षणाची तयारी ठेवून कामाला लागले पाहिजे· अन्याय, अत्याचार, शोषण हे औद्योगिक संस्कृतीचे एक अंग झाले आहे· ते बदलणे गरजेचे आहे, त्यासाठी प्रत्येकाने मानवी मूल्यांची अधिकाधिक जोपासना करावी आणि सहृदय व्यक्ती म्हणून स्वतःच्या क्षेत्रात जगावे·

व्यक्ती तितक्या प्रकृती, माणसांचे स्वभाव हे वेगवेगळे असणार, टकरा होणार हे सारे प्रत्येकाने सामावून घ्यायला हवे, एकमेकांना सामावून घेण्यात, समजावून घेण्यात मानवी जीवनाचे सुख अवलंबून आहे. प्रत्येकाने आपले काम आपण करावे, उगीच कुणाच्या आध्यातमध्यात आपण आणि दुसरे कोणी आपल्यातही नसावे, कुणाचाही अपमान करणे (अगदी स्वतःच्या पत्नीचाही) आणि कुणाच्याही वाटयाला अपमानित जिणे येणे अवचटांना आवडणारे नाही. सामाजिक बांधिलकी मानणारा, जीवनविषयक दृष्टीचे पूर्ण भान नि जाण असणारा हा लेखक आहे.

निष्कर्ष :-

या प्रकरणात आपण अनिल अवचटांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, कुटुंबीय स्वभाव, छंद, कार्यकर्ता म्हणून भूमिका, मुक्तांगण-मधील काम, पत्रकारिता, विविध पुरस्कार, ग्रंथसंपदा, जीवनविषयक दृष्टिकोण या घटकांचा विचार केला.

## संदर्भ टीपा


१ सोमण अंजली, ललित जून, १९९०पृ· ११ व १२

२ दैनिक सकाळ, पुणे आवृत्ती, दि· ८-१०-९३

३ दैनिक लोकसत्ता, पुणे आवृत्ती, दि· ८·१०·९३

४ अवचट अनिल, पूर्णिया, राजहंस प्रकाशन, पुणे, प·आ·१९६९

५ अवचट अनिल, वेध, नीलकंठ प्रकाशन, पुणे, प·आ·१९७४

६ अवचट अनिल, हमीद, नीलकंठ प्रकाशन, पुणे, प·आ १९७७

७ अवचट अनिल, अंधेरनगरी निपाणी, नीलकंठ प्रकाशन, पुणे, प·आ· १९७८

८ अवचट अनिल, छेद, नीलकंठ प्रकाशन, पुणे, प·आ· १९७९

९ अवचट अनिल, संभ्रम, अमेय प्रकाशन, नागपूर, व्दि·आ· १९८१

१० अवचट अनिल, वाघ्या-मुरळी, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प·आ १९८३

११ अवचट अनिल, कोंडमारा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प·आ· १९८५

१२ अवचट अनिल, गर्द, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प·आ· १९८६

१३ अवचट अनिल, मोर, मौज प्रकाशन, मुंबई, प·आ· १९८७

१४ अवचट अनिल, धार्मिक, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प·आ·१९८९

१५ अवचट अनिल, स्वतःविषयी, मौज प्रकाशन, मुंबई, प·आ·१९९०

१६ अवचट अनिल, अमेरिका, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प·आ· १९९२

१७ अवचट अनिल, माणसं, मौज प्रकाशन, मुंबई, ति·आ· १९८५

१८ अवचट अनिल, धागे आडवे उभे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प·आ·१९८६


## साधन साहित्य सूची


१ संपा·जोशी अनंत लक्ष्मण, मराठी सारस्वत प्रथम खंड,
अनमोल प्रकाशन, पुणे-2, प·आ·१९८६ पृ·३२

२ कुलकर्णी सुवर्ण, (कौटुंबिक सदरासाठीची मुलाखत)
किर्लोस्कर, ऑगस्ट १९९१ , पृ·२ व ३

३ अवचट अनिल, स्वतःविषयी,
मौज प्रकाशन, मुंबई, प·आ·१९९०